# कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
## तहकुब स्थायी समिती सभा क्र.०६ सन २०१७/१८

मंगळवार, दिनांक ०५/०९/२०१७

==================== ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ====================

**कार्यवृत्तांत**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची तहकूब सभा मंगळवार,दिनांक ०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे

**हजर सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. शौमिका अमल महाडिक | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील | सदस्य |
| ३. | मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरीडकर) | सदस्य |
| ४. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | सदस्य |
| ५. | मा.शुभांगी रामचंद्र शिंदे | सदस्य |
| ६. | मा.विशांत सुरेश महापुरे | सदस्य |
| ७. | मा.राहुल पांडुरंग पाटील | सदस्य |
| ८. | मा.जयवंत गुंडोपंत शिंपी | सदस्य |
| ९. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य |
| १०. | मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक निंबाळकर | सदस्य |
| ११. | मा.राहुल प्रकाश आवाडे | सदस्य |
| १२. | मा.कल्लाप्पा सतुराम भोगन | सदस्य |
| १३. | मा.संध्याराणी विलास बेडगे | सदस्य |

येणेप्रमाणे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष मा.पदाधिकारी, मा.समिती सदस्य व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** मा.अध्यक्ष मा.उपाध्यक्ष विषय समितीचे सभापती, व समिती सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी,अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य, सर्व खाते प्रमुख, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करतो. मा.अध्यक्ष यांच्या परवाणगीने दिनांक ०१/०९/२०१७ रोजीच्या तहकुब स्थायी समिती सभेचे कामकाज सुरू करुया.

**मा.अध्यक्ष :-** उपस्थित सर्वांचे स्वागत करते तरी दिनांक ०१/०९/२०१७ रोजीच्या तहकुब स्थायी समिती सभेचे कामकाज सुरू करुया.

**सचिवः-** आजच्या स्थायी सभेत दुःखवटयाचे व अभिनंदनाचे ठराव असल्यास सुचित करावे अशी सभागृहास मी विनंती करतो.

**मा.अरुणराव इंगवलेः-** जि.प.कोल्हापूर बांधकाम विभाग येथे परिचर पदावर कार्यरत असलेले श्री.भिमराव रामचंद्र रब्बे यांचे निधन झाले व धरणगुत्ती ता.शिरोळ येथिल ग्रामसेवक श्री.विनोद अशोक हेरवाडे, वय ३७ मु.पो. दत्तवाड ता.शिरोळ यांचे स्वाईन फ्लू ने निधन झाले.

**दुखवटयाचा ठराव:-**

**ठराव क्र.- १३३** **दिनांक ०५/०९/२०१७**

जि.प.कोल्हापूर बांधकाम विभाग येथे परिचर पदावर कार्यरत असलेले श्री.भिमराव रामचंद्र रब्बे वय ५७ मु.पो.सालपेवाडी ता.भुदरगड जि.कोल्हापूर यांचा दिनांक ०४/०९/२०१७ इ. रोजी सालपेवाडी ता.भुदरगड येथे विहीरीत पडून अपघाती मृत्यू झाला. कै.भिमराव रामचंद्र रब्बे यांना सभागृहाच्यावतीने दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरूणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव:-**

**ठराव क्र. १३४** **दिनांक ०५/०९/२०१७**

धरणगुत्ती ता.शिरोळ येथिल ग्रामसेवक श्री.विनोद अशोक हेरवाडे, वय ३७ मु.पो. दत्तवाड ता.शिरोळ यांचा स्वाईन फ्लूने दिनांक ०३/०९/२०१७ इ. रोजी बेळगांव येथील के.एल.ई.रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला. कै. विनोद अशोक हेरवाडे यांना सभागृहाच्यावतीने दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.अरूणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१ :-** महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.

**विषय क्र.२ :-** विषय समिती मधील घेणेत आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा करणे.

**सचिव:-** कोल्हापूर जिल्हयातील सर्वच तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहिर झाला असून राधानगरी, गगनबावडा, आजारा व हातकणंगले या चार तालुक्यातील ५०% पेक्षा जास्त गावांच्या निवडणूका असलेने तेथे पूर्ण आचारसंहिता लागू आहे. या शिवाय निवडणूक लागलेल्या गावांच्या सर्व सिमेलगतच्या गावांना सुध्दा आचारसहिंता लागू आहे.

**मा.मु.का.अ:-** सांडपाणी घनकचरा कार्यशाळेचे आयोजन केले असून सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यत हे प्रशिक्षण देणेत येणार आहे.

**उप मु.का.अ.(पाणी व स्वच्छता):-** स्वच्छ भारत अभियांन या उपक्रमांची प्रभावी अंम्मलबजावनी करणेकामी सर्व गट शिक्षणाधिकारी यांना निबंध स्पर्धा आयोजित करणे बाबत कळविले आहे.

**मा.सभापती (शिक्षण):-** बरेच शिक्षक स्वत: निबंध लिहतात व विद्यार्थ्याच्या नावाने देतात.

**मा.अरुणराव इंगवले:-** यासाठी वेगवेगळे गट करावेत.

**मा.अध्यक्ष:-** स्पर्धा सर्वांसाठी खुली असलीतर जास्त प्रभावीपणे अभियान राबविले जाईल.

**मा.राजवर्धन निंबाळकर:-** शिरोळ तालुक्यात इ.६ वी चा एक विद्यार्थी स्वच्छ भारत अभियांना बाबत अत्यंत प्रभावीपणे किर्तन करतो.

**मा.मु.का.अ:-** या विद्यार्थ्यास कार्यशाळेस बोलवावे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** छ.शाहु जन्म शताब्दी असलेने या बाबत अभियान राबविणेत येत आहे. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इ.आयोजन करणेत येणार आहे. कोल्हापूर व जिल्हयातील शाळांमध्ये प्रभातफेरीचे आयोजन केले आहे. छ.शाहू स्मारक भवनामध्ये विविध वक्त्यांना निमंत्रित करून कार्यक्रम घेणेत येणार आहे.

**मा.मु.का.अ.:-** या कार्यक्रमाचे मायक्रोप्लॅनिंग करून मला दाखवावे.

**मा.अरुणराव इंगवलेः-** ग्रामपंचायत आचार संहिता कालावधीत इमारत निर्लेखनाचे प्रस्ताव घेता येत असल्यास शिफारस करूया.

**मा.मु.का.अः-** या बाबत माझी निवासी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा झाली असून निर्लेखन हे नविन काम नसलेने या बाबत कार्यवाही करणेस हरकत नाही.

**मा.राहूल आवाडेः-** रक्कम रु.६.०० लक्ष या खर्चा मध्ये टाईप डिझाईन प्रमाणे अंगणवाडीचे इमारत बांधकाम बसत नाही या बाबत एम्पथी फौंडेशन यांनी अंगणवाडीची लांबी व रुंदी तेवढीच ठेवून तेवढीच खोली वेगळया टाईप मध्ये वेगळया मटेरियल मध्ये या खर्चात बांधता येईल यास परवाणगी आवश्यक आहे.

**मा.मु.का.अ.:-** या बाबत एम्पथी फौंडेशन यांच्याशी बोलून घ्यावे व निर्णय घ्यावा.

**मा.राहूल आवाडेः-** यातून अंगणवाडी इमारत बांधकामाबाबत उद्‌भवनारा विषय देखिल निकाली निघेल.

**मा.अध्यक्षः-** याकडे पायलट प्रोजेक्ट म्हणून बघता येईल.

**मा.अरुणराव इंगवलेः-** कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी या कामी पुढील कार्यवाही करावी.

**मा.अध्यक्षः-** शिक्षण विभाग (प्राथमिक) यांनी र.रु.४९.०० लक्ष रुपयाचे टिव्ही खरेदीचे ईटेंडर केले होते त्याचे काय झाले.

**मा.सभापती (शिक्षण):-** या बाबत कार्यवाही चालू आहे.

**मा.अध्यक्षः-** डिजीटल शाळा करणे या अंतर्गत रु.२३.०० लाख व रु.४९.०० लाख इतक्या रक्कमेचे टि.व्ही. खरेदी केले या बाबत काय झाले व १४ वा वित्त आयोगातुन कारवाई अपेक्षित होती तर हे टिव्ही कशासाठी खरेदी केले व खरेदी केले तर अध्यापही का वाटले नाहीत.

**मा.सभापती (शिक्षण):-** चौदाव्या वित्त आयोगामधुन कोण घेणार आहेत. हे पाहून निर्णय घेवुया.

**मा.अध्यक्षः-** आपण खरेदीची गडबड केली आहे. खर्च करणेपुर्वी नियोजन करणे आवश्यक आहे. तातडीने खरेदी केलेल्या टिव्हींचे वाटप करणे आवश्यक आहे.

**मा.अरुणराव इंगवलेः-** आमच्या गावात पाच शाळा आहेत वाटपाचे धोरण कसे ?

**मा.सभापती (शिक्षण):-** दिनांक २१ /०९/२०१७ पर्यत कार्यवाही करूया.

**मा.अध्यक्षः-** तुम्ही दि.२१/९/२०१७ नंतर टिव्ही देणार नाही काय?

**मा.राहुल आवाडेः-** दि. १५ ऑगष्ट च्या ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतीचा आराखडा मंजूर केला जातो. या आराखडयामध्ये टिव्ही ची तरतुद आहे. किंवा कसे याची खात्री करून सन २०१७-१८ चा कच्चा आराखडा तयार करा.

**मा.अरुणराव इंगवलेः-** बदल प्रस्तावामुळे उशिर झाला आहे.

**मा.राहुल आवाडेः-** सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये बऱ्याच शाळांनी टिव्ही खरेदी केले आहेत.

**मा.शिक्षण सभापती :-** एकूण १५०० शाळा डिजीटल करणार आहे पैकी ४५० शाळांचे ठराव प्राप्त झाले आहेत.

**मा.मु.का.अः-** या वर्षी १६०० शाळा पुर्ण करू व उर्वरीत बाबत पुढील वर्षी कार्यवाही करूया.

**मा.राहुल आवाडे:-** चौदावा वित्त आयोगाचे नियोजन सरपंच व ग्राम पंचायती मार्फत केले जाते यास पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेची मान्यता घेतली जात नाही त्यामुळे आम्हांला माहिती मिळत नाही.

**मा.उपाध्यक्ष:-** या मध्ये हस्तक्षेप करता येत नाही. जि.प. व पं.स. सदस्यांची मान्यता घ्यावी अशी सक्ती नाही.

**मा.अध्यक्ष:-** माहिती घेता येईल.

**मा.राहुल आवाडे:-** मान्यता घेतली पाहीजे कोल्हापूर जिल्हयात पायलट प्रोजक्ट म्हणून या बाबत कार्यवाही व्हावी.

**सचिव:-** प्रभाग समितीमध्ये हा विषय घ्यावा संबधित जिल्हा परिषद सदस्य प्रभाग समितीचे अध्यक्ष असलेने आढावा घेता येईल.

**मा.राहुल आवाडे:-** जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचे पत्र घ्यावे व आम्हांला माहिती दयावी.

**मा.अध्यक्ष:-** दिनांक २१/०९/२०१७ नंतर आचार संहिता कालावधी मध्ये टिव्ही चे वाटप होणार नाही.

**मा.राहुल आवाडे:-** बाजरात अनेक कंपन्यांचे (चायनिज) टिव्ही आहेत. यासाठी जि.प. कडे पैसे एकत्र दिले तर चालेल काय ?

**मा.सभापती (शिक्षण):-** आम्ही तिन मॉडेल दिले आहेत.

**विषय क्र.३ :-** जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील माहे मार्च २०१७ ते जुलै २०१७ अखेरची जमा खर्चाची पत्रके अवलोकन करणेबाबत **(अर्थ विभाग)**

**ठराव क्र.१३५** **दिनांक -०५/०९/२०१७**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे मार्च,एप्रिल, मे, जुन व जुलै २०१७ ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करण्यात आली. वित्त समितीने माहे मार्च,एप्रिल, मे २०१७ च्या मासिक लेख्यांना दिनांक ०७/०७/२०१७ रोजी माहे जून च्या मासिक लेख्यांना दिनांक ०४/०८/२०१७ रोजी आणि जुलैच्या मासिक लेख्यांना दिनांक २४/०८/२०१७ च्या सभेमध्ये केले शिफारशीनुसार त्यास मंजूरी देणेत येत आहे.

सुचक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.४ :-** श्री.बाळासाहेब भिमराव पाटील, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे वैद्यकिय रजा मंजूरी बाबत. **(अर्थ विभाग)**

**ठराव क्र.१३६** **दिनांक -०५/०९/२०१७**

**मा.अरुणराव इंगवले:-** श्री.पाटील यांच्या कालावधीतील बरेचसे कामकाज अपुर्ण असलेचे समजते सदर अपुर्ण बाबींची पुर्तता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विशेष पाठपुरावा करून पुर्ण करून घेणेत यावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद / पं.स. नियम १९६१ मधील कलम ९१ (२) व १०९ (३) (घ) नुसार वर्ग १ व वर्ग २ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या २ महिन्यांवरील रजा मंजुरीचे अधिकार स्थायी समिती सभेस आहेत. तथापी श्री.बाळासाहेब भिमराव पाटील उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची दिनांक २१/०६/२०१७ ते ०४/०८/२०१७ अशी ४५ दिवसांची वैद्यकिय रजेस मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.अरुणराव इंगवले:-** सध्या बांधकामांना आवश्यक दगड व वाळू उपलब्ध होत नाही. लांब अंतरावरून सदरचे बांधकाम साहित्य ठेकेदारास आणावे लागते या बाबत संबधित उप अभियंता, शाखा अभियंता या समस्येकडे लक्ष घालावे.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम):-** वाळू व दगड उपलब्ध होत नसलेस संबधित तहसिलदार यांचे पत्र घ्यावे अंतराचा विचार करून लिड वाढवुन देता येईल.

**मा.अरुणराव इंगवले:-** बांधकाम विभाग पं.स.हातकणंगले कडील श्री.दिनेश हत्तरगी व श्री.रुपेश वड्ड यांचे कामकाज समाधानकारक नाही त्यांची तेथून अन्यत्र कोठेही बदली करणेत यावी.

**मा.मु.का.अ.:-** ग्रामसभेमध्ये गावाचा समतोल विकास होणेच्या दृष्टीने चर्चा, मंजूरी होणे आवश्यक असते पन सध्या तश्या प्रकाराच्या ग्रामसभा होत नाहीत.

**मा.अरुणराव इंगवले:-** ग्रामसभा होत नाहीत हि वस्तुस्थिती खरी आहे.

**मा.मु.का.अ.:-** संबधित गावामध्ये घ्यावयाच्या योजना व कामा बाबत संगणकिय आराखडा व ई पोर्टल तयार करणारी संस्था आज आपल्याला त्यांच्या महत्वपुर्ण उपक्रमा बाबत माहिती व सादरीकरण करणार आहेत ते पाहुया.

तद्नंतर संबधित प्रतिनिधींनी गावाच्या सर्वांगीन विकासाची संकल्पनामांडून ई पोर्टलवर गावातील सर्व बाबींची संख्यात्मक माहिती संकलित करून परस्परांशी लिंक करून गावाच्या विकासासाठी एखादी महत्वपुर्ण योजना राबविणेकामी अचुकरित्या माहिती कशी उपलब्ध होते याबाबत सादरीकरण केले.

**मा.अरुणराव इंगवले:-** ही संकल्पना खरोखर चांगली आहे गावसभेला माणसांची गरज पडणार नाही.

**मा.सभापती (शिक्षण):-** या ई पोर्टलसाठी सर्वसाधारणता खर्च किती आहे.

**प्रतिनिधी:-** साधारणता र.रु.४२.०० लाख आवश्यक आहेत.

**मा.उपाध्यक्ष:-** कोडोली गांव पुर्ण करून डेमो दाखवावा.

**प्रतिनिधी:-** आमची स्वतः ची कंपनी नाही. सॉफ्टवेअर व हार्डवेअर डेव्हलपमेंटसाठी खर्च आवश्यक असलेने व गावातील माहिती संकलित करणेकामी येणारा खर्च विचारात घेता या ई पोर्टलसाठी जिल्हा परिषदेने तरतुद करणे आवश्यक आहे. हा पायलट प्रोजेक्ट कोडोली, बहिरेवाडी येथे करणेकामी मी काम केले आहे.

**मा.राहुल आवाडे:-** माझ्या मतदार संघातील एक गावात हि योजना राबवावी.

**मा.मु.का.अ.:-** शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील प्रत्येकी एक गांव घ्यावे.

**विषय क्र.५ :-** ग्रा.पं. घोसरवाड ता. शिरोळ येथील वाकीनगर पुर्नवसित वसाहती मध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**विषय क्र.६ :-** ग्रा.पं. गलगले ता. कागल येथील निवळे पुर्नवसित वसाहती मध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

वरील विषय क्र.५ व ६ बाबत चर्चा होऊन दि.०१/०९/२०१७ इ.रोजी पासून ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहिता सुरू झालेने आचारसहिंता संपेपर्यत सदर विषयावर निर्णय घेता येत नसले बाबत चर्चा करणेत आली.

**विषय क्र.७ :-** ग्रा.पं.गारगोटी ता.भुदरगड येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**ठराव क्र.१३७** **दिनांक -०५/०९/२०१७**

ग्रामपंचायत मौजे गारगोटी, ता.भुदरगड ग्रामपंचायत मालकीची ग्रांमपंचायत कार्यालय इमारत मिळकत नं १७३९ या इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक मौजे गारगोटी, ता.भुदरगड यांनी दि. १८/०७/२०१७ रोजी गट विकास अधिकारी भुदरगड यांचेकडे सादर केलेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९६५ साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारतीच्या भिंतीना भेगा पडलेल्या असुन, रुफकाम मोडकळीस आलेले असून, फरशी दबलेली असून इमारत वापरणेस धोकादायक बनलेली आहे. याबाबत ग्रामपंचायतीने इमारत निर्लेखन करणेबाबतचा मासिक सभा ठराव क्र. २०/१, दि. २९/६/२०१७ व ग्रामसभा ठराव क्र. ७, दि. ०१/०५/२०१७ रोजी अन्वये ठराव पारीत केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग), जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारतीच्या भिंतीना भेगा पडलेल्या असुन, रुफकाम मोडकळीस आलेले असून, फरशी दबलेली असून इमारत वापरणेस धोकादायक बनलेली असलेने निर्लेखनास शिफारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. प्रस्तावित इमारतीचे निर्लेखनानंतर सदर जागेवर ग्रामपंचायत कार्यालय व दुकानगाळे इमारत बांधणेचे ग्रामपंचायत मौजे गारगोटी ता. भुदरगड यांनी ठरविलेले आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदर इमारतीच्या भिंतीना भेगा पडलेल्या असुन, रुफकाम मोडकळीस आलेले असून फरशी दबलेली असून इमारत वापरणेस धोकादायक बनलेले असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत गारगोटी, ता.भुदरगड विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
अनुमोदक :- मा.अरूणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.८ :-** ग्रा.पं.बामणे ता.भुदरगड येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**ठराव क्र.१३८** **दिनांक -०५/०९/२०१७**

ग्रामपंचायत बामणे ता.भुदरगड ग्रामपंचायत मालकीची ग्रामपंचायत कार्यालय इमारत मिळकत नं ३६५ ही इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक बामणे ता.भुदरगड यांनी गट विकास अधिकारी भुदरगड यांचेकडे सादर केलेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९७६ साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असून निकामी झाली असलेने इमारत वापरणेस धोकादायक बनलेली आहे. याबाबत ग्रामपंचायतीने इमारत निर्लेखन करणेबाबतचा मासिक सभा ठराव क्र. १० दि.२६/१०/२०१६ व ग्रामसभा ठराव क्र. ०३ दि. २८/११/२०१६ रोजी अन्वये ठराव पारीत केलेला आहे. तसेच पंचायत समिती, भुदरगड कडील मासिक सभा ठराव क्र. ५२ दि.२३/०६/२०१७ अन्वये सदर निर्लेखनास मंजूरी दिलेली आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असून निकामी झाली असलेने इमारत वापरणेस धोकादायक बनलेली असलेबाबतचे निर्लेखन प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ नुसार अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदर इमारत पुर्ण मोडकळीस आलेली असून निकामी झाली असलेने इमारत वापरणेस धोकादायक बनलेली असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत बामणे ता. भुदरगड विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.९ :-** ग्रा.पं.तेरणी ता.गडहिंग्लज येथील ग्रामपंचायत इमारत निर्लेखन करणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**ठराव क्र. १३९** **दिनांक -०५/०९/२०१७**

ग्रामपंचायत मौजे तेरणी ता. गडहिंग्लज येथील ग्रामपंचायत मालकीची ग्रामपंचायत कार्यालय इमारत मिळकत नं ८३०/१ ही इमारतीचे निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच / ग्रामसेवक मौजे तेरणी ता. गडहिंग्लज यांनी गट विकास अधिकारी गडहिंग्लज यांचेकडे सादर केलेला आहे.

ग्रामपंचायत इमारतीचा असेसमेंट उतारा प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. सदरची इमारत सन १९८५ साली बांधणेत आलेली आहे. सदर इमारत दगड मातीची असल्याने पुर्णपणे मोडकळीस आली आहे व इमारत पुर्णपणे वापरणेस धोकादायक बनलेली आहे. याबाबत ग्रामपंचायतीने इमारत निर्लेखन करणेबाबतचा मासिक सभा ठराव क्र. ४०, दि. १२/०८/२०१६ व ग्रामसभा ठराव क्र. १०, दि. ०९/०५/२०१७ रोजी अन्वये ठराव पारीत केलेला आहे. तसेच पंचायत समिती गडहिंग्ल कडील मासिक सभा ठराव क्र. ५३८ /९, दि. २६/०८/२०१६ रोजीने निर्लेखनाचा ठराव मांडलेला आहे.

कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग), जि. प. कोल्हापूर यांचेकडून सदर इमारत दगड मातीची असल्याने पुर्णपणे मोडकळीस आली आहे व इमारत पुर्णपणे वापरणेस धोकादायक बनलेली असलेने निर्लेखनास शिफारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेत आलेले आहे. तसेच निर्लेखनाचे अंदाजपत्रक सोबत सादर केलेले आहे. प्रस्तावित इमारतीचे निर्लेखनानंतर सदर जागेवर ग्रामपंचाय कार्यालय इमारत बांधणेचे ग्रामपंचायत मौजे तेरणी, ता. गडहिंग्लज यांनी ठरविलेले आहे.

शासन परिपत्रक दि. ०९/०१/२०१२ व शासन पुरक परिपत्रक क्र. जिपई/२०११/प्र.क्र./१९८/पंरा-७, दि. ८/६/२०१२ या परिपत्रकातील सर्व अटीस अधीन राहून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरची इमारत दगड मातीची असल्याने पुर्णपणे मोडकळीस आली आहे व इमारत पुर्णपणे वापरणेस धोकादायक असलेने व भविष्यात वापरास धोकादायक असलेने, सदर इमारतीचे निर्लेखन करणेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

सदरच्या ग्रामपंचायत इमारतीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत तेरणी, ता. गडहिंग्लज विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे. सबब सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

सुचक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१० :-** जिल्हा ग्राम विकास निधीतुन ग्राम पंचायत गारगोटी ता.भुदरगड कडील ग्रामपंचायत कार्यालय, सभागृह व दुकानगाळे या प्रस्तावित कामास कर्ज मंजूर होऊन मिळणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

**विषय क्र.११ :-** ग्रा.पं. म्हासुर्ली ता.राधानगरी यांना प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता जागा खरेदीसाठी जिल्हा ग्राम विकास निधी मधुन कर्ज मंजूरी बाबत. **(ग्रामपंचायत)**

**विषय क्र.१२ :-** जिल्हा ग्राम विकास निधीतुन ग्राम पंचायत उजळाईवाडी ता.करवीर यांना ट्रॅक्टर, ट्रॉली खरेदीसाठी कर्ज मंजूर होऊन मिळणे बाबत. **(ग्रामपंचायत)**

वरील विषय क्र.१० ते १२ बाबत चर्चा होऊन दि.०१/०९/२०१७ इ.रोजी पासून ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहिता सुरू झालेने आचारसहिंता संपेपर्यत सदर विषयावर निर्णय घेता येत नसले बाबत चर्चा करणेत आली.

**विषय क्र.१३ :- नाविण्य पूर्ण योजना (कॅन्सर पूर्व लक्षणे व कॅन्सर रूग्ण शोध मोहिम सन २०१६-१७ जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूरी बाबत. ) (आरोग्य)**

**ठराव क्र.१४०** **दिनांक -०५/०९/२०१७**

जिल्हा नियोजन समिती कडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता नाविन्य पूर्ण योजने अंतर्गत शिरोळ तालुक्यामध्ये कॅन्सर पूर्व लक्षणे व कॅन्सर रूग्ण शोध मोहिम या योजनेस जिल्हा नियोजन समिती कडून प्रशासकिय मान्यता मिळाली आहे.

तरी प्रस्तावित योजना अवलोकनार्थ येऊन अंमलबजावणीस स्थायी समिती सभेमध्ये मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१४ :-** मेन राजाराम हायस्कुल, कोल्हापूर येथील मैदानाची जागा पार्कींगकरीता देणेबाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१४१** **दिनांक -०५/०९/२०१७**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** मेन राजाराम हायस्कूल कडील मैदान नवरात्र उत्सव सुट्टीच्या कालावधीत पार्किंग करीता विनामुल्य दिले जाते. हे मैदान पे अॅन्द पार्क साठी दयावे किंवा कसे याबाबत सदर विषय ठेवणेत आला आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** हे मैदान सुट्टीच्या कालावधीत पे अॅन्ड पार्कसाठी देऊया यातुन जिल्हा परिषदेस उत्पन्न मिळेल.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक):-** यापुर्वी पोट मक्तेदार नेमून हे मैदान भाडे तत्वावर दिले होते परंतु पोलिस प्रशासनाने शिवाजी पुतळयापासून रस्ते वहातुकीसाठी बंद ठेवले या कारणास्तव सदर मैदानापर्यत वहाने येऊच शकली नाहीत.

**मा.अरुणराव इंगवले:-** मा.मु.का.अ. यांनी या बाबत मा.जिल्हा पोलिस प्रमुख याच्याशी चर्चा करावी. म्हणजे पोलिस प्रशासनाचे सहकार्य लाभेल.

**मा.राहुल आवाडे:-** जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढले पाहिजे सदर मैदान पे-अँड पार्क साठी देणेत यावे.

**मा.उपाध्यक्ष:-** आपण यातुन जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढवूया.

**मा.मु.का.अ.:-** मी या बाबत मा.जिल्हा पोलिस प्रमुख याच्याशी चर्चा करतो व भाविकांना कोणताही त्रास न होईल या दृष्टीने निर्णय घेवु.

**मा.अरुणराव इंगवले:-** महानगरपालिके प्रमाणे दर आकारणी करावी.

मा. संजय मोहिते, पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांचेकडील वरील विषयाबाबतचे दि. १०/०८/२०१७ चे पत्रान्वये दि. २५/०८/२०१७ ते दि. ०५/०९/२०१७ अखेर श्री. गणेश उत्सव सन २०१७ साठी मेन राजाराम हायस्कुल कोल्हापूर कडील मैदान वाहनांच्या पार्कींगकरिता देणेबाबत कळविले आहे.

सदरचा विषय शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ मध्ये ठेवणेत येवून सदरचा विषय स्थायी समिती सभेची मंजूरी घेऊन जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेबाबत ठरले. तसेच मा. सभापतीसो,

शिक्षण व अर्थ समिती, जि प कोल्हापूर यांनी दि.०३/०८/२०१७ चे पत्रान्वये मेन राजाराम हायस्कुल कडील मैदानाची जागा पे-अँड पार्कीगकरिता दिलेस शाळेच्या आवारामध्ये स्वच्छता राहील व जि. प. उत्पन्नामध्ये वाढ होणेस मदत होईल अशा आशयाचे पत्र दिले.

यावर स्थायी समिती सभा दि. ०५/०९/२०१७ मध्ये सविस्तर चर्चा होवून सदरचा विषय जि. प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेस शिफारस करणेत आली आहे.

सुचक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.अरूणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.राहुल आवाडे:-** खाजगी माध्यमिक शाळेचे जुने बेंचेस व इतर साहीत्य निर्लेखनास जिल्हा परिषदेची मान्यता लागते प्रस्ताव देवुन देखिल अध्यापही निर्लेखनास मान्यता प्राप्त नाही.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक):-** सदर विषय निर्लेखन बाबतचा आहे सदर शाळेचा प्रस्ताव प्राप्त असलेस कार्यवाही करतो.

**विषय क्र.१५ :-** वि.मं.दिगवडे ता.पन्हाळा या शाळेच्या ०२ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१४२** **दिनांक -०५/०९/२०१७**

वि.मं.दिगवडे ता. पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील २ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०२ खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत. व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला आहेत. शिक्षण समिती सभा ठराव क्र-३९ दि. ०३/०८/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ क्र | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | वि.मं. दिगवडे | २ | १९९०<br>१९९१ | २७<br>२६ | डोंगरी विकास योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०२ खोली निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१६ :-** वि.मं.मुडशिंगी ता.करवीर या शाळेच्या ०३ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १४३** **दिनांक -०५/०९/२०१७**

वि.मं. गडमुडशिंगी ता. करवीर येथील प्राथमिक शाळेतील ३ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबंधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. करवीर गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०३ खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत. व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला आहेत. शिक्षण समिती सभा ठराव क्र.३७ दि. ०३/०८/२०१७ अन्वये ०३ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचा विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | करवीर | वि.मं.गडमुडशिंगी | ३ | १९५९ | ४७ | सरकारी |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०३ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
अनुमोदक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१७ :-** कन्या वि.मं.कळे ता.पन्हाळा या शाळेच्या ०५ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१४४** **दिनांक -०५/०९/२०१७**

कन्या वि. मं. कळे ता. पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील ५ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ अन्वये ०५ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | कन्या विद्या मंदिर कळे | ०५ | १९७६ | ४१ | स्थानिक विकास निधी |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०५ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१८ :-** कुमार वि.मं. कळे ता.पन्हाळा या शाळेच्या ०४ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१४५** **दिनांक -०५/०९/२०१७**

कुमार वि. मं. कळे ता. पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील ०४ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियन १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ अन्वये ०४ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | कुमार विद्या मंदिर कळे | ०४ | १९७६ | ४१ | स्थानिक विकास निधी |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०४ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.१९ :-** प्रा.केंद्र शाळा मिणचे खुर्द ता.भुदरगड या शाळेच्या ०७ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१४६** **दिनांक -०५/०९/२०१७**

प्राथमिक केंद्र शाळा मिणचे खुर्द ता. भुदरगड येथील प्राथमिक शाळेतील ७ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. भुदरगड गटांकडून खाली नमूद

केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०७ खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत. व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला आहेत. शिक्षण समिती सभा ठराव क्र.३८ दि. ३/०८/२०१७ अन्वये ०३ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुदरगड | केंद्र शाळा मिणचे खु | ७ | १९८६-८७ | ३० | N.R.E.P. व ग्रामपंचायत जनरल फंड |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०४ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
अनुमोदक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२० :-** नाव पुरविणेचा धनादेशची मुदत वाढविणे बाबत.**(बांधकाम)**

**ठराव क्र.१४७** **दिनांक -०५/०९/२०१७**

मौ. धरणगुत्ती ता. शिरोळ येथे सन २०१२-१३ मध्ये ४० प्रवासी वाहतूकीची क्षमता असलेली नवीन नाव मे. ओमकार इंडस्ट्रीज सांगली यांनी पुरवठा केली होती. सदर नावेचा बिलाचा धनादेश क्र. ११९२१५ दि.३०/०३/२०१३ ने संबधितांना अदा केला होता. परंतू सदरचा धनादेश मुदती बाहेर गेलेने त्याची मुदत वाढवून मिळणेबाबत मे. ओमकार इंडस्ट्रीज सांगली यांनी कळविले आहे. मे.ओमकार इंडस्ट्रीज सांगली यांनी मौ. धरणगुत्ती ता.शिरोळ, येथे नाव पोहोच केले नंतर नावेमध्ये लिकेज असलेने त्यांना धनादेश देणेत आलेला नव्हता. त्यानंतर त्यानी नावेचे लिकेज काढून देवून नाव दुरुस्त करून दिलेली होती. त्यामुळे त्यांचे देयक अदा करुन त्यांना धनादेश देणेत आलेला होता. तरी सदर धनादेशाचा दिनांक वाढविणेस मंजुरी मिळणेसाठी सदरचा विषय मा.जि.प. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस सदरची स्थायी समिती सभा सर्वानुमते शिफारस देत आहे.

सुचक :- मा.शुभांगी रामचंद्र शिंदे
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक-निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२१ :-** जिल्हयातील महिला पशुपालकांना पशुसंवर्धन विषयक मायक्रो ट्रेनिंग देणे **(पशुसंवर्धन)**

**ठराव क्र.१४८** **दिनांक -०५/०९/२०१७**

**मा.सभापती (शिक्षण):-** या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींच्या वहातुक खर्चासाठी किमान रक्कमेचा समावेष करावा.

**मा.उपाध्यक्ष:-** प्रशिक्षणार्थीचा किमान एस.टी. खर्च भागावा अशी तरतुद करावी.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** निश्चित रक्कम ठरवावी.

**मा.मु.का.अ.:-** आर.सी.टी. प्रमाणे वहातुक खर्च धरावा.

पशुसंवर्धन विभागामार्फत सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद स्वनिधीमधून जिल्हयातील महिला पशुपालक दुध उत्पादकांना यशस्वी पशुपालकांकडे (Micro Training) मायक्रो ट्रेनिंग व्दारे एक दिवशीय गोठा भेट, प्रात्यक्षीक व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करणे हि नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हयातील ग्रामीण दुधउत्पादक महिला लाभार्थींना दुग्धव्यवस्थापनाचे व शास्त्रशुध्द पशुपालनाचे ज्ञान अवगत करणे. दुध व दुग्धजन्य पदार्थनिर्मिती तंत्रज्ञान, चारा व्यवस्थापन, पशुप्रजननाचे नियोजन याबाबतचे प्रगतशिल दुध उत्पादक व आदर्श पशुपालकांकडे प्रत्यक्षात महिलांना एक दिवसाचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाव्दारे प्रशिक्षण देणे हा या योजनेचा उद्देश असून जिल्हयातील आदर्श पशुपालक गोठाधारक, ज्यांच्याकडे शुध्द देशी जातीची जनावरे, संकरीत जनावरे म्हैशी अशी किमान ४० पशुधनाचा गोठा असणाऱ्या पशुपालकांकडे दुध काढण्याचे मशिन, भरपूर पाण्याची सोय, हवेशीर व पक्का गोठा, मुक्त संचार गोठा, कडबाकुट्टी मशीन, गोबरगॅस, निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया करण्याचे तंत्रज्ञान, पुरेशी जमीन, दुधाची स्निग्धता तपासण्याचे यंत्र, भरपूर उजेड इ. बाबी तसेच किमान ४० ते ५० पशुपालकांसाठी बैठक व्यवस्था व प्रोजेक्टरव्दारे प्रशिक्षण देण्याची सोय असणाऱ्या पशुपालकांची निवड करुन त्यांना जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत मायक्रोट्रेनिंग सेंटर चालविण्यास मान्यता व अनुदान देण्यात येणार आहे. हि योजना राबविल्यामुळे महिला पशुपालकांना आधुनिक व शास्त्रोक्त पध्दतीने पशुपालन करण्याची आवड निर्माण होईल. व योग्य मार्गदर्शनामुळे कृत्रिम रेतन, वंधत्व निवारण, लसीकरण, वासरांचे संगोपन याबाबत आवड निर्माण होवून पशुपालन व्यवसाय वृध्दींगत होईल व दुध व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीमध्ये वाढ होईल.

सदर योजना जिल्हयातील सर्व गटातील महिला लाभार्थीसाठी असून प्रति लाभार्थी रु. १८०/- खर्च अपेक्षित आहे. असे एकुण जिल्हयातील ५००० लाभार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी एकुण तरतुद रु ९.०० लक्ष खर्च अपेक्षित असून सदरचा निधी पुर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेणे प्रस्तावित आहे.

सदर योजना राबविण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभा दि. १६/८/२०१७ ने मान्यता देवुन स्थायी समितीस शिफारस केली आहे. सदर योजना राबविण्यास प्रशासकिय मान्यता देणेचे अधिकार मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे आहेत. वरील योजना राबविण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी जिल्हा सर्व साधारण सभेस शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२२ :-** यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या पारितोषिक रक्कमेतून वित्त विभागाकडील फर्निचर व केबिन करणेच्या कामास मान्यता मिळणे बाबत.**(सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र.१४९** **दिनांक -०५/०९/२०१७**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. तेंव्हा पंचायत राज संस्थांच्या कामगीरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यसंस्कृती वाढविणे आवश्यक आहे. यासाठी पंचायतराज संस्थामधुन प्रशासकीय व्यवस्थापन व विकासकार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीसाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासुन विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरावर अभिनव पुरस्कार योजना सुरु करणेत आली असुन ही योजना या पुढे कायम स्वरुपी राबविणेत येणार आहे. सन २०११-२०१२ पासून पंचायत राज मंत्रालय,

भारत सरकार यानी पंचायतराज संस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना व राज्यातील पंचायत राज संस्थाना प्रोत्साहन देणेसाठी पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना सुरू केली आहे. केंद्र शासनाने या पंचवार्षिक योजनेत राबवित असलेल्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानात या योजनेचा समावेश केला आहे. राज्य पुरस्कृत यशवंत पंचायतराज अभियान व केंद्र पुरस्कृत राजीव गांधी सशक्तीकरण अभियान योजना यांचा उद्देश एकच असल्याने दोन्ही योजना राज्य शासनाकडून एकत्रीतपणे राबविणेत येत आहेत.

पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मुल्यांकन विचारात घेवून विभागस्तर व राज्यस्तरावर जिल्हा परिषदेकडून केलेल्या उत्कृष्ठ कामाबद्दल प्रोत्साहनपर कोल्हापूर जिल्हा परिषदेस (राज्य स्तर) व विभागीय स्तरावर एकूण सन २०१६-२०१७ अखेर एकूण ८०,००,०००/- इतकी तरतूद प्राप्त झाली असून ती अर्थ विभागाकडे खाते क्र. ४ मध्ये जमा आहे.त्यापैकी महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए १००८/ प्रक्र १४८/पंरा-१ दिनांक २४/१२/२००९ अन्वये यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत प्राप्त झालेला निधी विनियोग करणेबाबतची मार्गदर्शक तत्वे शासनाने विहित केलेली आहेत. त्याप्रमाणे आज अखेर रक्कम रू. ५६,८७,१७७/- इतका खर्च झालेला आहे. शिल्लक रक्कम रू. २३,१२,८२३/- इतकी शिल्लक आहे. त्यापैकी ३०% निधी मधील रक्कम रू. ११,६२,४७३/- मधून यापूर्वी २,७२,४०६/- प्रशासकिय इमारतमधील उप.मु.का.अ. यांचे दालनातील दुरूस्ती व कागलकर हाऊस सभागृह नुतणीकरण करणेच्या कामाकरीता प्रशासकिय मान्यता देवून शिल्लक रक्कम रू. ८,९०,०६७/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

आता बांधकाम विभाग यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडील प्रशासन शाखेमध्ये केबिन बनविणे व पार्टीशन करणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे कक्षामध्ये फरशी जुन्या पार्टीशनला कलर देणे पॉलीश करणे दरवाजे बदलणे इ. अनुषंगिक काम प्रशासकिय इमारत जिल्हा परिषद कोल्हापूर येथील दुरूस्तीचा प्रस्ताव इमारत विभागाने सादर केला आहे.

त्यामध्ये सदरच्या अदांजपत्रकीय रक्कमेच्या अनुषंगाने वर नमुद केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता दिनांक २४ डिसेंबर २००९ चे शासन निर्णयानुसार प्रशासकिय इमारत सुधारणा या सदरा खालील बाब म्हणून खर्च करणे आवश्यक आहे. सदरची कामे ३०% निधी कार्यालय सजावट, कार्यालयाचे संगणकीकरण आणि बैठक व्यवस्था करणेसाठी यापूर्वी मंजूरी देवून शिल्लक तरतूद रक्कम रू. ८,९०,०६७/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर बाब क्र. २ मधील वरील शिल्लक रक्कमेमधून उपरोक्त वर नमुद केलेल्या वित्त विभागाकडील प्रशासन विभागातील केबीन व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे केबीन करीता एकूण रक्कम रू. ४,६३,९९८/- चे अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव मंजूर करणेस हरकतीचे वाटत नाही.

| अ.नं. | बाब निहाय लेखाशिर्षाचा तपशिल | एकूण प्राप्त तरतूद | आता पर्यंत झालेला खर्च | शिल्लक तरतूद | शिल्लक रक्कमेतून घ्यावयाची योजना |
|---|---|---|---|---|---|
| १ | बक्षिसाच्या रक्कमेपैकी १५% निधी संबंधित पंचायत राज संस्थेच्या इमारतीची डागडूजी यासाठी खर्च करण्यात यावा. | १२,००,०००/- | ८,२४,१५०/- | ३,७५,८५०/- | ३० टक्के या बाब क्र. २ मधून यापूर्वी प्रशासकिय मान्यता देवून रू.८,९०,०६७/- ची प्रशासकिय मान्यता प्रस्तावित केली आहे. आता वित्त |
| २ | ३०% निधी कार्यालय सजावट, कार्यालयाचे | २४,००,०००/- | १२,३७,५२७/- | ११,६२,४७३/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | संगणकीकरण, आणि बैठक व्यवस्था करण्यासाठी खर्च करण्यात यावा. | | | | विभागाकडील केबीन इ.फर्निचर करीता ४,६३,९९८/- प्रस्ताव मान्यतेसाठी सादर |
| ३ | ५ % निधी कार्यालय परिसरातील स्वच्छता तसेच कार्यालयातील शौचालयासाठी वापरण्यात यावा. | ४,००,०००/- | ० | ४,००,०००/- | |
| ४ | पंचायत राज संस्थांना मिळालेला पुरस्कार हा पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या एकत्रित गुणवत्ता पूर्ण कामामुळे मिळालेला असतो त्यांना प्रोत्साहन देणेसाठी ५% निधी राखुन ठेवण्यात यावा. अधिकारी आणि कर्मचारी यांची निवड ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभा तसेच पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करण्यात येईल. | ४,००,०००/- | २५,५००/- | ३,७४,५००/- | |
| ५ | ४५% रक्कम पंचायत राज संस्थेमधील इतर विकास कामे, सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, शिक्षण आणि आरोग्य विषयक सुधारणा यासाठी वापरण्यात यावा. यामध्ये पंचायत राज संस्थामधील अंगणवाड्या, बालवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांच्यातील सुधारणासाठी | ३६,००,०००/- | ३६,००,०००/- | ० | यापूर्वी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वापरण्यात यावा. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे, पुढील शिक्षणासाठी मदत यासाठी हा निधी वापरण्यात यावा.या रक्कमेचा विनियोग कोणत्याही सामुहिक विकास योजनेवर खर्च करण्यास तसेच पंचायत राज संस्था आर्थिक व प्रशासकीय दृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी खर्च करण्यास अनुमती आहे. | | | | |
| | **एकूण रक्कम रुपये** | **८,००,०००/-** | **५६,८७,१७७/-** | **२३,१२,८२३/-** | |

वर प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या बाबीकरीता दिनांक २४ /१२/२००९ चे शासन निर्णयानुसार बाब क्र. २ मध्ये सदरचे काम बसते. त्या बाबीमध्ये आज अखेर प्रस्तावित केलेल्या कामास मंजूरी देवून आता त्यामध्ये एकूण रक्कम रू. ८,९०,०६७/-इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यामधून आता इमारत विभागाने प्रस्तावित केलेल्या मुख्य प्रशासकिय इमारत येथील वित्त विभागाकडे केबीन बनविणे व पार्टीशन करणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची केबीन दुरूस्ती करणे बाबतचा एकूण रक्कम रू. ४,६३,९९८/- अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामाकरीता रक्कम रू. ४,६३,९९८/- रक्कमेचे अंदाजपत्रक घेवून सदर प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही. सदरचा निधी हा जिल्हा परिषद स्वनिधी मध्ये असल्याने सदरचा प्रस्ताव लगतच्या स्थायी समितीची मंजूरी घेवून जिल्हा सर्व साधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार सदरचा निधी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने खर्च करावयाचा असल्याने सदर विषय स्थायी समिती सभेमध्ये चर्चा होवून सदर विषयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
अनुमोदक :- मा.शुभांगी रामचंद्र शिंदे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२३ :-** यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या पारितोषिक रक्कमेतून ग्रामपंचायत,वित्त व सामान्य प्रशासन विभागसाठी संगणक व प्रिंटर खरेदी करणेस मान्यता मिळणे बाबत. **(सामान्य प्रशासन)**

**ठराव क्र.१५०** **दिनांक -०५/०९/२०१७**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. तेंव्हा पंचायत राज संस्थांच्या कामगीरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यसंस्कृती वाढविणे आवश्यक आहे. यासाठी पंचायतराज संस्थामधुन प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीसाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासुन विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरावर अभिनव पुरस्कार योजना सुरु करणेत आली

असुन ही योजना या पुढे कायम स्वरुपी राबविणेत येणार आहे. सन २०११-२०१२ पासून पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यानी पंचायतराज संस्थेच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या राज्यांना व राज्यातील पंचायत राज संस्थाना प्रोत्साहन देणेसाठी पंचायत सबलीकरण व उत्तरदायित्व प्रोत्साहन योजना सुरू केली आहे. केंद्र शासनाने या पंचवार्षिक योजनेत राबवित असलेल्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानात या योजनेचा समावेश केला आहे. राज्य पुरस्कृत यशवंत पंचायतराज अभियान व केंद्र पुरस्कृत राजीव गांधी सशक्तीकरण अभियान योजना यांचा उद्देश एकच असल्याने दोन्ही योजना राज्य शासनाकडून एकत्रीतपणे राबविणेत येत आहेत.

पंचायत राज प्रशासन व विकास कार्यात उत्कृट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या कामाचे मुल्यांकन विचारात घेवून विभागस्तर व राज्यस्तरावर जिल्हा परिषदेकडून केलेल्या उत्कृष्ठ कामाबद्दल प्रोत्साहनपर कोल्हापूर जिल्हा परिषदेस (राज्य स्तर) व विभागीय स्तरावर एकूण सन २०१६-२०१७ अखेर एकूण ८०,००,०००/- इतकी तरतूद प्राप्त झाली असून ती अर्थ विभागाकडे खाते क्र. ४ मध्ये जमा आहे. त्यापैकी महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए १००८/ प्रक्र १४८/पंरा-१ दिनांक २४/१२/२००९ अन्वये यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत प्राप्त झालेला निधी विनियोग करणेबाबतची मार्गदर्शक तत्वे शासनाने विहित केलेली आहेत. त्याप्रमाणे आज अखेर रक्कम रू. ५६,८७,१७७/- इतका खर्च झालेला आहे. शिल्लक रक्कम रू. २३,१२,८२३/- इतकी शिल्लक आहे. त्यापैकी ३०% निधी मधील रक्कम रू. ११,६२,४७३/- मधून २,७२,४०६/- प्रशासकिय इमारतमधील उप.मु.का.अ. यांचे दालनातील दुरूस्ती व कागलकर हाऊस सभागृह नुतणीकरण करणेच्या कामाकरीता प्रशासकिय मान्यता देवून शिल्लक रक्कम रू. ८,९०,०५०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यामधून आता वित्त विभागाकडील प्रशासन कक्षामधील केबीन तयार करणे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे केबीन करीता एकूण रक्कम रू. ४,६३,९९८/- इतकी रक्कमेचे प्रस्तावास मंजूरी देवून रक्कम रू. ४,२६,०५२/- इतकी रक्कम शिल्लक राहते. सदर शिल्लक रक्कमे मधून ग्रामपंचायत विभागास ३ संगणक व वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागास ३ संगणक व प्रिंटर प्रत्येकी ३ खरेदी करावयाचे आहेत. त्याकरीता अंदाजे रक्कम रू. १,६८,००० + २,०२,८०० = ३,७०,८००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च करावायाचा झालेस स्थानिक दरपत्रके मागणी करून सदरचा खर्च करणे आवश्यक आहे.

त्यामध्ये सदरच्या अदांजपत्रकीय रक्कमेच्या अनुषंगाने वर नमुद केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता दिनांक २४ डिसेंबर २००९ चे शासन निर्णयानुसार प्रशासकिय इमारत सुधारणा या सदरा खालील बाब म्हणून खर्च करणे आवश्यक आहे. सदरची कामे ३०% निधी कार्यालय सजावट, कार्यालयाचे संगणकीकरण आणि बैठक व्यवस्था करणेसाठी शिल्लक तरतूद रक्कम रू. शिल्लक रक्कम रू. ४,२६,०५२/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर बाब क्र. २ मधील वरील शिल्लक रक्कमेमधून आता एकूण रक्कम रू. ३,७०,८००/- चे संगणक / प्रिंटर खरेदी करणे करीता अंदाजपत्रकीय प्रस्ताव मंजूर करणेस हरकतीचे वाटत नाही.

| अ.नं. | बाबनिहाय लेखाशिर्षाचा तपशिल | एकूण प्राप्त तरतूद | आता पर्यंत झालेला खर्च | शिल्लक तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | बक्षिसाच्या रक्कमेपैकी १५% निधी संबंधित पंचायत राज संस्थेच्या इमारतीची डागडूजी यासाठी खर्च करण्यात यावा. | १२,००,०००/- | ८,२४,१५०/- | ३,७५,८५०/- | ३० टक्के या बाब क्र. २ मधून आज अखेर ७,३६,४७१/-ची प्रशासकिय मान्यता प्रस्तावित केली आहे. त्यामध्ये एकूण ४,२६,००२/- इतकी शिल्लक आहे. त्यामधून |
| २ | ३०% निधी कार्यालय सजावट, कार्यालयाचे संगणकीकरण, आणि बैठक व्यवस्था करण्यासाठी खर्च करण्यात यावा. | २४,००,०००/- | १२,३७,५२७/- | ११,६२,४७३/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आता ग्रामपंचाययत विभाग व वित्त विभाग,सामान्य प्रशासन विभागास संगणक/प्रिंटर खरेदी करणेस मान्यतामिळावी. |
| ३ | ५ % निधी कार्यालय परिसरातील स्वच्छता तसेच कार्यालयातील शौचालयासाठी वापरण्यात यावा. | ४,००,०००/- | ० | ४,००,०००/- | |
| ४ | पंचायत राज संस्थांना मिळालेला पुरस्कार हा पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या एकत्रित गुणवत्ता पूर्ण कामामुळे मिळालेला असतो त्यांना प्रोत्साहन देणेसाठी ५% निधी राखुन ठेवण्यात यावा. अधिकारी आणि कर्मचारी यांची निवड ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभा तसेच पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करण्यात येईल. | ४,००,०००/- | २५,५००/- | ३,७४,५००/- | |
| ५ | ४५% रक्कम पंचायत राज संस्थेमधील इतर विकास कामे, सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम, शिक्षण आणि आरोग्य विषयक सुधारणा यासाठी वापरण्यात यावा. यामध्ये पंचायत राज संस्थामधील अंगणवाड्या, बालवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांच्यातील सुधारणासाठी वापरण्यात यावा. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे, पुढील शिक्षणासाठी मदत यासाठी हा निधी वापरण्यात यावा.या रक्कमेचा विनियोग कोणत्याही सामुहिक विकास योजनेवर खर्च करण्यास तसेच पंचायत राज संस्था आर्थिक व प्रशासकीय दृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी खर्च करण्यास अनुमती आहे. | ३६,००,०००/- | ३६,००,०००/- | ० | यापूर्वी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. |
| | **एकूण रक्कम रुपये** | **८,००,०००/-** | **५६,८७,१७७/-** | **२३,१२,८२३/-** | |

वर प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या बाबीकरीता दिनांक २४/१२/२००९ चे शासन निर्णयानुसार बाब क्र. २ मधून सदरची खरेदी करता येते. आज अखेर प्रस्तावित केलेल्या प्रशासकिय मंजूरी देवून आता त्यामध्ये एकूण रक्कम रू.४,२६,००२/- इतकी रक्कम शिल्लक आहे. आता बाब क्र. २ मध्ये शिल्लक रक्कमेमधून ग्रामपंचात विभागास व सामान्य प्रशासन विभागास लागणारे संगणक / प्रिंटर खरेदी करून घेणेस मान्यता देणेस हरकत नाही. सदरचा निधी हा जिल्हा परिषद स्वनिधी मध्ये असल्याने सदरचा प्रस्ताव लगतच्या स्थायी समितीची मंजूरी घेवून जिल्हा सर्व साधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार सदरचा निधी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने खर्च करावयाचा असल्याने सदर विषय स्थायी समितीमध्ये चर्चा करून जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकामी स्थायी समिती सभेची शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरिडकर)
अनुमोदक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.अरुणराव इंगवले:-** माध्यमिक शिक्षण विभागासाठी स्टेशनरी करीता आवश्यक तरतुद उपलब्ध नाही या बाबत उपाययोजना करावी.

**विषय क्र.२४ :-** वि.मं.ठाणेवाडी ता. कागल या शाळेच्या ०२ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१५१** **दिनांक -०५/०९/२०१७**

वि. मं. ठाणेवाडी ता. कागल येथील प्राथमिक शाळेतील २ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. कागल गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने मा.अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ कोल्हापूर यांचेकडील मंजूरीच्या अधिन राहून सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कागल | वि.मं.ठाणेवाडी | २ | १९९५ | २२ | डोंगरी विकास योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०२ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.अंबरिंषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२५ :-** वि.मं.जाधववाडी ता. पन्हाळा या शाळेच्या ०१ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१५२** **दिनांक -०५/०९/२०१७**

वि.मं.जाधववाडी ता. पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील १ खोली निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०१ खोलीचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेला असलेने सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ अन्वये ०१ खोली निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी सभे मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | वि.मं. जाधववाडी | १ | १९९० | २७ | डोंगरी विकास योजना |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०१ खोली निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.विशांत सुरेश महापुरे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२६ :-** वि.मं.करंजफेण ता.पन्हाळा या शाळेच्या ०२ खोल्या निर्लेखन करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१५३** **दिनांक -०५/०९/२०१७**

वि.मं.करंजफेण ता.पन्हाळा येथील प्राथमिक शाळेतील २ खोल्या निर्लेखन करणे बाबतचा प्रस्ताव संबधित गट शिक्षणाधिकारी / उप-अभियंता (बांधकाम) ता. पन्हाळा गटांकडून खाली नमूद केलेल्या शाळा खोल्या विद्यार्थ्यांना बसणेस धोकादायक असलेने अशा खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत शिफारशीसह व पंचायत समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर खाली नमुद केले प्रमाणे ०२ खोल्यांचे निर्लेखन करणेबाबत कार्यकारी अभियंता (बांधकाम) जि.प.कोल्हापूर यांनी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० (१) व १२३ नुसार पहिल्या अनुसूचीतील अ.क्र.२७ नुसार जिल्हा परिषदेची कामे किंवा विकास योजना अंमलात आणणे आणि त्या सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे. सदरच्या खोल्या जि.प. मालकीच्या आहेत व निर्लेखन करण्याचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेला असलेने सदरच्या विषयास शिक्षण समिती सभा दि.०१/०९/२०१७ अन्वये ०२ खोल्या निर्लेखन करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरच्या विषय स्थायी मार्फत जि.प. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी शिफारस केली आहे. सदरच्या खोल्या पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तालुका | शाळेचे नांव | निर्लेखन खोली संख्या | बांधकाम वर्ष | बांधकामास पूर्ण झालेली वर्षे | कोणत्या निधीतून बांधणेत आली |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा | करंजफेण | २ | १९७६<br>१९९३ | ४१<br>२४ | विकास योजना<br>जि.प. फंड |

सदरचे निर्लेखन मंजूरीचे अधिकार जि.प.सर्वसाधारण सभेचे आहेत. या ०२ खोल्या निर्लेखन करणेकामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकरीता स्थायी समिती शिफारस करणेत येत आहे.

सुचक :- मा.शुभांगी रामचंद्र शिंदे
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२७ :-** वि.म.कुमार वाकरे व वि.म.कन्या वाकरे ता.करवीर या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**विषय क्र.२८ :-** वि.म.सोनाळी व वि.म.बेघर सोनाळी ता.भुदरगड या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

**विषय क्र.२९ :-** वि.म.कन्या कोथळी व वि.म.कुमार कोथळी ता.शिरोळ या दोन शाळा एकत्रीकरण करणे बाबत. **(प्रा.शिक्षण)**

वरील विषय क्र.२७ ते २९ बाबत चर्चा होऊन दि.०१/०९/२०१७ इ.रोजी पासून ग्रामपंचायत निवडणूक आचारसंहिता सुरू झालेने आचारसहिंता संपेपर्यत सदर विषयावर निर्णय घेता येत नसले बाबत चर्चा करणेत आली.

**विषय क्र.३० :-** मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखीव २०% निधीतील योजना सन २०१७-१८ मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे या योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत .**(समाजकल्याण)**

**ठराव क्र.१५४** **दिनांक -०५/०९/२०१७**

**मा.उपाध्यक्ष:-** समाजमंदीर इमारत दुरूस्तीसाठी काही निधी देता येईल का ते पहावे.

**मा.सभापती (समाजकल्याण):-** समाजमंदीर दुरूस्तीसाठी रु.१.०० लाखापेक्षा जास्त निधीसाठी परवागणी मिळणे बाबत शासनास प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासननिर्णय क्र. मागास १०९८/ प्र.क्र.४१८/ २४ दि.१४/९/१९८९ मधील तरतूदीनुसार सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकुण स्वउत्पन्नातील २०% निधी मागासवर्गीयांच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवावा व त्यातून मागासवर्गीय कल्याणासाठीच्या वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी एकुण रु.२,०६,६१,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी सहा लाख एकसष्ठ हजार फक्त) इतकी तरतूद केली आहे.

त्यानूसार मागासवर्गीयासाठी राखीव २०% निधीतील योजना अंतिमत: खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | पुनर्विनियोजनानंतर अंतिम तरतूद (आकडे रुपयात) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **मागासवर्गीयांसाठी राखीव २०% सेस फंडातील योजना** | |
| | **अ) मागासवर्गीय व्यक्तींसाठी योजना** | |
| १ | इ.५ वी ते १० वीमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे | ३०,००,००० |
| २ | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे | ४५,००,००० |
| ३ | समाजकल्याण समिती सदस्यांकरीता कामकाज निरीक्षण प्रशिक्षण अभ्यास दौरा आयोजित करणे | ५,००,००० |
| ४ | कोर्ट / वकील फी, संगणक खरेदी / दुरुस्ती, देखभाल, कार्यालयीन खर्च | ६,६१,००० |
| ५ | मागासवर्गीय व्यक्तींना शिलाई मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ३०,००,००० |
| ६ | मागासवर्गीय व्यक्तींना झेरॉक्स मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ५०,००,००० |
| | **अ एकूणः-** | **१,६६,६१,०००** |
| | **ब) मागासवर्गीय महिलांसाठी योजना** | |
| ८ | इ. ५ वी ते १० वीमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना सायकल पुरविणे | ३०,००,००० |
| ९ | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत दळप सयंत्र पुरविणे | २५,००,००० |
| १० | मागासवर्गीय महिला बचत गटांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण - ३० दिवसांचा कोर्स<br>१. फॅशन डिझायनिंग कोर्स<br>२. ब्युटी पार्लर कोर्स<br>३. कुकिंग कॅटरींग कोर्स | २५,००,००० |
| ११ | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत शिलाई मशिन पुरविणे | २५,००,००० |
| १२ | मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत पिको फॉल मशिन पुरविणे | १५,००,००० |
| १३ | मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ३०००००० |
| १४ | मागासवर्गीय महिलांना झेरॉक्स मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ४०००००० |
| १५ | इ.५वी ते १० वीच्या मागासवर्गीय विद्यार्थीनींना सायकल पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ३०००००० |
| | **ब एकूण :-** | **१,९५,००,०००** |
| | **अ व ब एकूण :-** | **३,६१,६१,०००** |

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र..झेडपी/ २०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक १९ मार्च, २०१२ व शासन निर्णय क्र.झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक ३१ जानेवारी, २०१३ अन्वये रुपये १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार

खातेप्रमुखांना आहेत, रुपये १०,००,००१/- ते २०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये २०,००,००१/- ते २३,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीच्या सभापतींना, रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीस, रुपये २५,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस व ५०,००,००१/- व त्यापुढील रक्कमेच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभेस आहेत. तसेच रुपये ५,००,००१/- ते १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना, रुपये १०,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व रुपये ५०,००,००१/- व त्यावरील खर्चाच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागास किंवा अशा विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय आयुक्त / राज्यस्तरीय संचालक यांना आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने मागासवर्गीयासाठी राखीव असलेल्या २०% निधीतून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात हाती घेतलेल्या उपरोक्त तक्यातील क्र. २ मधील खालील योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद, स्थायी समितीस आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | केलेली तरतूद रुपयात |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे. | ४५,००,००० |

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करण्याचा ठराव मा.समाज कल्याण समितीने दि. १६/८/२०१७ च्या सभेत ठराव क्र. ९ नूसार केला आहे.

सदर अनुषंगाने उपरोक्त योजनेस मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता मिळण्याचा विषय दि.१/९/२०१७ च्या सभेत मंजूरीसाठी सादर करण्यात आला. सदर प्रकरणी स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाल्यानंतर सदर योजनेच्या नावात व निकषात खालीलप्रमाणे बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला

| अ.क्र. | योजनेचे पुर्वीचे नाव | अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मागासवर्गीय वस्तीमध्ये खुली व्यायामशाळा उभारणे | १)ज्या गावामध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या वस्त्या आहेत अशाच गावात ही योजना राबविण्यात येईल<br>२)सदरची खुली व्यायामशाळा उभारण्यासाठी ग्रामपंचायतीने संबधित वस्तीत किमान २०*४० चौरस फूट खुली जागा उपलब्ध करून देणे आवश्यक राहील अथवा सदर वस्तीमध्ये वरील क्षेत्रफळाची जागा उपलब्ध असावी<br>३)सदरची खुली व्यायामशाळा अनुसूचित जाती, नवबौध्द,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या वस्त्यांमध्येच उभारण्यात येईल.<br>४)सदर योजना कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागात राबविण्यात येईल.<br>५)संबंधित वस्तीमध्ये या योजनेचा यापुर्वी लाभ दिलेला नसावा . |

| अ.क्र. | योजनेचे सुधारीत नाव | सुधारीत निकष, अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मागासवर्गीय वस्तीतील | १)ज्या गावामध्ये अनुसूचित जाती, नवबौध्द, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या वस्त्या आहेत अशाच गावातील संबंधित वस्तीमध्ये ही योजना राबविण्यात येईल |

| | | |
|---|---|---|
| | समाजमंदिरात व्यायामाचे साहित्य पुरविणे | २)सदरच्या वस्तीमध्ये समाजकल्याण विभागाच्या वा इतर कोणत्याही योजनेतून समाजमंदिर अथवा शासकीय इमारत झालेली असावी.<br>३)सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने समाजकल्याण विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>४)या योजने अंतर्गत मंजूर अनुदानाची रक्कम डी.बी.टी व्दारे ग्रामपंचायतीच्या खाती जमा करण्यात येईल.<br>५) या योजने अंतर्गत समाजकल्याण समितीने निश्चित केलेल्या मानकानुसार ग्रामपंचायतीने विहित आर्थिक मर्यादेत साहित्य खरेदी करणे आवश्यक राहिल.<br>६) संबंधित वस्तीमध्ये यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून व्यायामाचे साहित्य मिळालेले नसावे. |

विभागाने उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार योजनेच्या नावांत, निकष, अटी व शर्तिप्रमाणे वरीलप्रमाणे बदल करण्यास मंजूरी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसा विषय आगामी सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर करण्यात यावा.

सुचक :- मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील
अनुमोदक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३१ :-** अपंग कल्याणासाठी राखीव ३% निधीतील योजना सन २०१७-१८ अपंग व्यक्तींना स्वंयरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत झेरॉक्स मशिन पुरविणे या योजनेस प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत. **(समाजकल्याण)**

**ठराव क्र.१५५** **दिनांक -०५/०९/२०१७**

**मा.राहुल आवाडे:-** जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागात जि.प. चे व शासनाचे कर्मचारी आहेत पैकी शासनेचे कर्मचारी सामान्य लोकांना चांगली वागणूक देत नाहीत त्यांच्या बाबत तक्रारी वाढत आहेत.

**मा.सभापती (समाजकल्याण):-** आम्ही दोन अनुभवी कर्मचारी यांची मागणी मा.मु.का. अ. यांचे कडे केली आहे ते मिळावेत.

**मा.सभापती (शिक्षण):-** कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सभापती (समाजकल्याण) यांनी लक्ष घालावे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासननिर्णय क्र. संकिर्ण-२००७/ प्रक्र.४८७१/ वित्त-३, दि.५/१०/२०१२ मधील तरतूदीनुसार सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकुण स्वउत्पन्नातील ३% निधी अपंगाच्या कल्याण व पुर्नवसनाकरीता राखून ठेवावा व त्यातून अपंग कल्याणासाठीच्या वैयक्तीक व सामुहिक लाभाच्या योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत. सदर अनुषंगाने ग्रामविकास विभाग, शासननिर्णय क्रमांक अपंग-२०१५/ प्र.क्र.१३७/ वित्त-३, दि.२४ नोव्हेंबर, २०१५ अन्वये शासनाने अपंगासाठी राखीव ३% निधीतून राबवायच्या योजनांची यादी विहीत केली आहे. यामध्ये सामुहिक लाभाच्या एकुण २३ योजना असून वैयक्तीक लाभाच्या एकुण ३४ योजना आहेत.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ या चालू आर्थिक वर्षात अपंग कल्याणासाठी एकुण रु.१,४०,६३,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी चाळीस लाख त्रेसष्ठ हजार फक्त) इतकी तरतूद केली आहे. सदर तरतूदीतून जिल्हा परिषदेने मुळ अंदाजपत्रकात खालील योजना मंजूर केल्या आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | जिल्हा परिषद लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकातील तरतूद |
|---|---|---|---|
| १ | अपंग व्यक्तींना कॅन्सर, क्षयरोग, मेंदुचे विकार, ह्दय शस्त्रक्रिया इ. दुर्धर आजराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे. | २२३५-१०२-A२१ | २५,००,०००/- |
| २ | अपंग व्यक्तींना व्यवसायासाठी व्हेंडीग स्टॉल टपरी पुरविणे. | २२३५-१०२-A२१ | ७०,००,०००/- |
| ३ | अपंगत्व प्रतिबंधात्मक पुनर्वसन व सोयी सुविधाबाबत प्रचार, प्रसिध्दी जनजागृती करणे. | २२३५-१०२-B२१ | १०,००,०००/- |
| ४ | अपंग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. DBT | २२३५-१०२-B२१ | २०,००,०००/- |
| ५ | अपंग व्यक्तींना स्वंयरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे.(मिरची कांडप मशीन, घरघंटी-दळप संयत्र, दुरध्वनी कॉइनबॉक्स, झेरॉक्स मशिन, पापड मशिन, पत्रावळया मशिन पुरविणे, कडबा कुट्टी मशीन इ.) | २२३५-१०२-B२१ | ५,००,०००/- |
| ६ | राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड झालेल्या जिल्हयातील शहरी व ग्रामिण भागातील अपंग खेळाडूना अर्थसहाय्य. | २२३५-१०२-३५ | ५,००,०००/- |
| ७ | कार्यालयीन खर्च | २२३५-१०१-१३ | ५,६३,०००/- |
| | | **एकुण** | **१,४०,६३,०००/-** |

मा. समाज कल्याण समितीने दि. ९/५/२०१७ च्या सभेत ठराव क्र.२ अन्वये सदर योजने मध्ये अंशतः बदल करुन त्यात काही नविन योजनांची भर घातली आहे. सोबतच योजनेच्या तरतूदी पुनर्विनियोजनाद्वारे कमी-जास्त केल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर पुनर्विनियोजनास मा.स्थायी समितीने दि.७/७/२०१७ च्या सभेत ठराव क्र. १०३ नूसार मंजुरी दिली असून त्या अनुषंगाने मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने दि. ११/७/२०१७ च्या सभेत ठराव क्र.५७ नूसार पुनर्विनियोजनास मंजुरी प्रदान केली आहे. त्यानूसार अपंगासाठी राखीव ३% निधीतील योजना अंतिमतः खालीलप्रमाणे आहेत.:-

| अ.क्र. | योजनेचे नांव | पुनर्विनियोजनानंतर अंतिम तरतूद (आकडे रुपयात) |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| १ | अपंग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान या करीता अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अपंग व्यक्तीस व्हिलचेअर देणे. | ५००००० |
| २ | आंतरराष्ट्रीय /राष्ट्रीय/ राज्यस्तरावर स्पर्धेसाठी निवड होवून सहभागी झालेल्या ग्रामीण भागातील अपंग खेलाडूंना अर्थसहाय्य देणे. | ५००००० |
| ३ | अपंगत्व प्रतिबंधात्मक पुनर्वसन व सोयी सुविधाबाबत प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती करणे. | १०००००० |
| ४ | अपंग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. | २०००००० |
| ५ | अपंग व्यक्तीना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत दळप | २५००००० |

| | | |
|---|---|---|
| | संयत्र पुरविणे. | |
| ६ | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत झेरॉक्स मशिन पुरविणे. | ५००००००० |
| ७ | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत मिरची कांडप मशिन पुरविणे. | २००००००० |
| ८ | कोर्ट/ वकील फी, संगणक खरेदी/ दुरुस्ती, देखभाल, कार्यालयीन खर्च. | ५६३००० |
| ९ | अपंग व्यक्तींना झेरॉक्स मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ४९००००० |
| १० | अपंग व्यक्तींना दळप संयत्र पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ३०००००० |
| ११ | अपंग व्यक्तींना मिरची कांडप मशिन पुरविणे (सन २०१६-१७ मधील योजना) | ४५००००० |
| | **एकुण** | **२६४६३०००** |

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.झेडपी/ २०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक १९ मार्च, २०१२ व शासन निर्णय क्र.झेडपीए/२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९, दिनांक ३१ जानेवारी, २०१३ अन्वये रुपये १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना आहेत, रुपये १०,००,००१/- ते २०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये २०,००,००१/- ते २३,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीच्या सभापतींना, रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विषय समितीस, रुपये २५,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीस व ५०,००,००१/- व त्यापुढील रक्कमेच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद, सर्वसाधारण सभेस आहेत. तसेच रुपये ५,००,००१/- ते १०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना, रुपये १०,००,००१/- ते ५०,००,०००/- पर्यंतच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांना व रुपये ५०,००,००१/- व त्यावरील खर्चाच्या योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागास किंवा अशा विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय आयुक्त/ राज्यस्तरीय संचालक यांना आहेत.

कोल्हापूर जिल्हा परिषदेने अपंगासाठी राखीव असलेल्या ३% निधीतून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात हाती घेतलेल्या उपरोक्त तक्यातील क्र. ६ मधील खालील योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा. जिल्हा परिषद, स्थायी समितीस आहे.

| **अ.क्र.** | **योजनेचे नांव** | **केलेली तरतूद रुपयात** |
|---|---|---|
| १ | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत झेरॉक्स मशिन पुरविणे. | ५०,००,०००/- |

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करण्याचा ठराव मा. समाज कल्याण समितीने दि. १६/८/२०१७ च्या सभेत ठराव क्र. ९ नूसार केला आहे.

विभागाने उपरोक्त प्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी साधने व उपकरणे पुरविणे अंतर्गत झेरॉक्स मशिन पुरविणे या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- मा.विशांत सुरेश महापुरे
अनुमोदक :- मा.राहुल पांडूरंग पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३२ :-** मौजे शेंडूर येथील डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डाच्या नांवे असलेली जमीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांच्या नावे करणेबाबत. **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र. १५६** **दिनांक -०५/०९/२०१७**

सरपंच / ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत शेंडूर ता.कागल यांनी त्यांचेकडील दि. ११/५/२०१७ नुसार गट नंबर २२०९ व सिटी सर्वे नं. ३४९ ची जागा डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डच्या नांवे (प्राथमिक शाळेची इमारत) नोंद आहे. सध्या ती जागा पडसर असून,सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने सदर जागेची मालकी गट नं. २२०९ व सिटी सर्वे नं. ३४९ ची एकूण ३० आर इतकी जागा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे नांवे करणेबाबत ग्रामसभा ठराव क्र. ०६ दि. ८/५/२०१७ ने ठराव संमत करणेत आला आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीमध्येही याबाबत ठराव करणेत आला आहे.

याबाबत शिक्षण समिती सभा दि.३/८/२०१७ ऐनवेळचा विषय क्रं. ८ ठराव क्रं. ४४ मान्यता मिळालेली आहे. तरी सदरचा विषय स्थायी समितीमार्फत जि.प.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेत येत आहे .

सुचक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
अनुमोदक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.३३ :-** इ.११ वी चा वर्ग सुरू करणेबाबत राजर्षि शाहू छत्रपती विद्यानिकेतन, शिंगणापूर **(प्रा.शिक्षण)**

**ठराव क्र.१५७** **दिनांक -०५/०९/२०१७**

**शिक्षणाअधिकारी (प्राथ):-** राजर्षि शाहू छत्रपती विद्यानिकेतन, शिंगणापूर कडे इ.११ वी चा वर्ग विना अनुदान तत्वावर स्वंय अर्थ सहाय्यीत या मधून सुरू करणे बाबत सदरचा विषय मान्यतेकामी ठेवणेत आला आहे.

**मा.सभापती (शिक्षण):-** पालकांच्या मागणीनुसार हा प्रस्ताव ठेवलेला आहे. एम.आर.हायस्कुल गडहिंग्लज कडील असा प्रस्ताव जि.प. सर्व साधारण सभेने नाकारला आहे.

**मा.अरुणराव इंगवले:-** जिल्हा परिषदेकडे स्वनिधी मध्ये पुरेसे पैसे नाहीत यासाठी मोठा खर्च होणार आहे हा विषय जिल्हा परिषद सभेपुढे निर्णयाकामी ठेवणेत यावा.

मुख्याध्यापक, रा. शा. छ. विद्यानिकेतन, शिंगणापूर यांचेकडील दि. ३०/०१/२०१७ चे पत्रान्वये राजर्षी शाहु छत्रपती विद्यानिकेतन, शिंगणापूर येथे दि. २४/१२/२०१६ रोजी झालेल्या पालक सभेमध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी इ. १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे १० वी चे शिक्षण पूर्ण झालेनंतर त्यांना पुढील प्रवेशासाठी इ. ११ वी चा वर्ग सुरु करावा अशी मागणी केली व मा. मु. का. अ. यांना तसे कळवावे अशी पालकांनी विनंती केली होती.

प्रस्तुत विषयाबाबत शिक्षण समिती सभा दि. ०१/०९/२०१७ मध्ये ठेवणेत आला होता. सदर बाबत शिक्षण समितीमध्ये सविस्तर चर्चा होवून सदरचा विषय स्थायी समितीमार्फत जि. प. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस मान्यता मिळालेली आहे.

याबाबत दि. ०५/०९/२०१७ चे स्थायी समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होवून सदरचा विषय जि. प. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस करणेत आली.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.राहुल प्रकाश आवाडे
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.सभापती (म.बा.क.):-** निमशिरगांव ता.शिरोळ कडील ग्रामसेवकांवर दोषी असताना कारवाई होत नाही.

**मा.मु.का.अ.:-** या बाबत माहिती प्राप्त झाली आहे मी चौकशी करत आहे.

**मा.सभापती (म.बा.क.):-**या बाबत कार्यवाही उप मु.का.अ.(ग्रा.पं.) यांच्यास्तरावर सत्वर होणे आवश्यक आहे. व नेहमी मा.मु.का.अ. व मा.अध्यक्ष यांच्याकडे जाणे आवश्यक नाही असे वाटते.

**मा.राजवर्धन नाईक - निंबाळकर:-** बऱ्याच वेळा जुन्या तक्रारी डावलून नवीन तक्रारीवर कामकाज होते हे चुकीचे आहे यात वेगळा संशय येतो. साजणी ग्रामपंचायत कडील एकाच गटावर कार्यवाही होते अन्य गटावर कार्यवाही होणे आवश्यक असता झाली नाही. गट विकास अधिकारी व उप अभियंता यांच्यास्तरावर हि प्रकरणे सोयी प्रमाणे हाताळली जातात या बाबत मी मागिल मिटींग मध्ये बोललो होतो.

**मा.मु.का.अ.:-** या बाबत गट विकास अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत. आम्ही कोणत्याही तक्रारीत राजकिय पार्श्वभुमी बघीतली जात नाही.

**मा.अरुणराव इंगवले:-** निनावी तक्रार अर्जावर कार्यवाही केली जाते व तपासणी पथक पाठविले जाते हे योग्य नाही. या बाबत ठोस धोरण ठरावा.

**मा.मु.का.अ.:-** पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत सत्ता गेल्यावर विरोधी गटाकडून तक्रारी येतात.

**मा.अरुणराव इंगवले:-** गावसभेकडे तक्रारी नकोत.

**मा.अध्यक्ष:-** तक्रारी करणे बाबत काही वेळेचे बंधन आहे काय?

**मा.राजवर्धन नाईक - निंबाळकर:-** तक्रारीचे मुळ सदर योजनेसाठी वापरलेले मटेरीअल असते निकृष्ठ दर्जाचे साहित्य वापरल्याने तक्रारी होतात. चांगल्या दर्जाच्या पाईप्स इ.साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

**मा.अध्यक्ष:-** संबधित ग्रामपंचायतीने योजना ताब्यात घेतली पाहीजे. एक वर्षात योजना पुर्ण करून दिली पाहीजे.

**मा.अरुणराव इंगवले:-** योजना ताब्यात घेत नसलेस प्रोत्साहन अनुदान थांबवावे.

**मा.मु.का.अ.:-** थांबवू शकत नाही.

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.):-** तेथे दुरूस्तीची योजना घेवु नये.

**मा.अध्यक्ष:-** चिखली ग्रा.पं. कडील योजने बाबत तक्रारीची मला माहिती दिली नाही.

**मा.मु.का.अ.:-** धोरण म्हणून तक्रारीच्या मिटींग व्हाव्यात व प्राधान्य क्रम ठरविणेत यावा.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** एन.आर.एच.एम. / जे.एस.वाय. या योजने अंतर्गत लाभ मिळाला नाही प्राप्त तक्रारीची पैसे बाबतची खात्री केली.

**मा.राजवर्धन नाईक - निंबाळकर:-** आपण कंत्राटी डॉक्टर भरणार होतो त्याचे काय झाले.

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** शासनाने पदे भरू नयेत म्हणून कळविले आहे.

यानंतर मा.सभापती (शिक्षण) यांनी सभेस उपस्थित असलेले सर्व पदाधिकारी, सदस्य, सर्व अधिकारी व खाते प्रमुख यांचे आभार मानले. तद्नंतर मा.अध्यक्ष यांनी सभा खेळीमेळीत चालवणेस सहकार्य केले बद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक ०५/०९/२०१७

| | |
|---|---|
| **(आर.बी.भालेराव)** | **(शौमिका महाडिक)** |
| **सचिव तथा** | **सभापती स्थायी समिती तथा** |
| **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.)** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा परिषद, कोल्हापूर** | **जिल्हा परिषद,कोल्हापूर** |